पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०५/२०२३
## दि.१८/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २१२/२०२३,भादविक ३०७,३२३,३३६,४२७,१४१,१४२,१४३,१४४,१४६,१४७,१४८,१४९,३४, महा.पो.का.क. ३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | सागर लोखंडे,वय ३२ वर्षे,रा.कृष्णकुंज सोसायटी,नऱ्हे,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्यांचे इतर सात साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०२३ रोजी रात्री १०/४५ वा.व्हि.आर.कॅफे व्हिजन स्कुल जवळ,जेएसपीएम रोड,दुर्गा कॅफे समोर नऱ्हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र ऋषिकेश याचे भावाचे लग्नाचा मांडवटाळा कार्यक्रमा मध्ये ऋषिकेश व यातील नमुद इसम यांचेमध्ये झालेल्या वाद झाल्याचे कारणावरून फिर्यादी व मयुर गावडे असे त्यांचेमधील वाद मिटवुन नमुद ठिकाणी जेवण करण्यासाठी गेले असता,सदर इसमांनी एकत्र येवुन,प्रथम हाताने मारहाण करून,त्यानंतर धारदार हत्याराने मारुन,दगड फेकुन मारुन,कॅफेवर दगड मारुन,कॅफेची तोडफोड केली. तसेच तेथे जमलेल्या लोकांमध्ये दशहत निर्माण करुन,त्यांचे हातातील लोखंडी कोयते फिर्यादी यांचेवर उगारुन,"थांब तुला मारुन टाकतो" असे मोठ-मोठयाने ओरडुन,लोखंडी कोयत्याचे सहाय्याने फिर्यादी यांचे डोक्यास व दोन्ही हाताचे मनगटावर मारहाण करुन,त्यांना गंभीर जखमी करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राहुल यादव ९५५२१६०७२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १५५/२०२३,भादविक ३२६,५०४,५०६,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | अरबाज शेख,वय-१८ वर्षे,रा.गोपी चाळ,खडकी,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा. गोपी चाळीच्या समोर खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जैन बेकरी,खडकी बाजार येथे घरातील साहित्य घेण्यासाठी नमुद ठिकाणाहुन जात असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना खुन्नस देवुन पाहिले असा गैरसमज करून,त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,त्यांचे खिशातुन चाकु काढुन,फिर्यादी यांचे छातीत वार करून,त्यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आण्णा गुंजाळ ९९७०७४६४५६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २०८/२०२३,भादविक ३३७,३२४,५०४,५०६(२),३४,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,क्रिमनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट ३ व ७,सावकारी अधिनियम ३९ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२४ वर्षे,रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | १.संजय कारभारी शिंदे,वय ३१ वर्षे,रा.सागर पार्क लेन नं.१,चंदननगर पुणे २.शंकर हरीदास साबळे,वय २० वर्षे,रा.साईनाथनगर,चंदननगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०२३ रोजी रात्रौ २३/१५ वा. सर्वोदय हॉटेल समोर जुना मुंढवा रोड,चंदननगर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती रोशन याचे ओळखीचा आ.क्र.१ यांचेकडुन त्यांचे दाजी प्रतिक दुरंदर यांचेकडुन व्याजाने घेतलेल्या पैशांचे पोटी गहाण म्हणुन ठेवलेला,एच.पी.कंपनीचा लॅपटॉप माघारी घेणेसाठी थांबुन व त्याचेकडुन यापुर्वी गेल्या तीन महीन्यापासुन लॅपटॉपची मागणी करीत असताना,त्यास सदर गोष्टीचा राग मनात ठेवुन,फिर्यादी यांचे पती रोशन यांना शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच त्याचे चारचाकी गाडीत ठेवलेला धारधार हत्यार बाहेर काढुन,रोशन यांचे अंगावर जात असताना,फिर्यादी हया मध्ये आले असता,धारधार हत्यार त्यांचे उजवे हाताच्या दंडास लागुन जखमा झाल्या आहेत. त्याचप्रमाणे त्याचे बरोबर असलेला त्याचा साथीदार आ.क्र.२ याने त्याचे पॅन्टच्या खिशातुन चाकु काढुन,फिर्यादी व त्यांचे पती रोशन असे दोघांचे दिशेने रोखुन धरुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, भगवान कांबळे ८२०८३८३४६३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १३१/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३०वर्षे,रा.शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा.स्वारगेट येथील नेहरू स्टेडीयम शेजारील पीएमपील बस स्टॉप येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया स्वारगेट येथील नेहरू स्टेडीयम शेजारील पीएमपील बस स्टॉप येथे थांबले असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे नकळत सोन्याचे मंगळसुत्र व २,५००/- रूपये रोख रक्कम असा एकुण १,४२,५००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. फिर्यादी यांचे शेजारी उभी असलेली महिला हिने फिर्यादी यांना उजव्या बगलेतील पर्स डाव्या बगलेत घेण्यास सांगितली असल्याने,तीने सदरची चोरी केली असावी असा फिर्यादीस संशय आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. येवले ८८८८०२२५२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २११/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | भेरू कुमावत,वय-२३,रा.सोमनाथनगर,वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी पुरुष वय अंदाजे २३ ते २५ वर्षे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा. श्री.सावलिया ज्वेलर्स,वडगाव-शेरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे श्री.सावलिया ज्वलर्स या दुकानात हजर असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे ज्वलर्स दुकानात सोन्याची अंगठी खरेदी करण्याचा बहाण्याने दुकानात येवुन,त्यांचे दुकानात असलेल्या गर्दीचा फायदा घेवुन,त्याने दुकान असलेल्या सोन्याचे अंगठ्याच्या ट्रे मधील एक सोन्याची अंगठी ७९,०००/- रु किची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, कळसाईत ९०४९९८९७३५ / ८६६९०७३५८३ |

## <u>दि.१९/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १६०/२०२३,भादविक ३२४,१४१,१४२,१४३,१४४,१४६,१४७,१४८,१४९,५०४,५०६, महा.पो.का. क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४० वर्षे,रा.लोहीयानगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर चार साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०२३ रोजी रात्री ००/०५ वा.लोहीयानगर ए.पी.५४,कल्यानकर पुला जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे राहत्या घराच्या बाहेर आरडा-ओरडा येत असल्याने,त्यांचे घरा समोर मोठ-मोठयाने शिवीगाळ व आरडा-ओरडा करीत असणारा यातील नमुद इसम व त्याचे इतर साथीदार यांनी फिर्यादीस कोठे आहेत तुमचे भाईलोग,तुमच्या भाईलोकांना मी मारतो असे म्हणुन त्याने त्याचे हाता मध्ये असणारी हॉकी स्टीक फिर्यादी यांचे डाव्या कानावरती व हातावरती मारुन जखमी केले. तसेच फिर्यादी यांचा भाऊ मुस्ताक रौफ शेख याने तुम्ही माझ्या बहीणीला का मारले असा जाब विचारल्याचे कारणावरून त्यांनी तेथे पडलेले दगड उचलुन मारल्याने,त्यामध्ये फिर्यादी यांचा भाऊ मुस्ताक रौफ शेख,त्यांची मुलगी संजना परदेशी व परिसरात राहणारी महिला यांना सदरचे दगड लागुन त्यांना दुखापत करून,शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, काळे ७७३८२२८६४४ |

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १३०/२०२३,भादविक ३०७,३२६,३२३,५०४,५०६,४२७,३४,महा.पो.का.क.३७(१) (३)१३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | राहुल जमादार,वय-१९ वर्षे,रा.कळस,आळंदी रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०२३ रोजी रात्री २१/३० वा. आर ॲन्ड डि.ई. गेट समोरील मेवाड आईस्क्रीम,आळंदी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र १.गोपाल गुंडेकर,वय २० वर्षे २.तुषार जठार,वय १९ वर्षे ३.सनी पवार,वय २० वर्षे यांचेसह नमुद ठिकाणी एकत्र आईस्क्रीम घेत असताना,फिर्यादी यांचे परीचयाचे यातील नमुद इसमांनी त्यांचे ओळखीची मुलगी हीस फिर्यादी यांनी मॅसेज का केला या कारणावरुन त्यांना शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. तसेच त्याचा साथीदार याने फिर्यादीस तुला आता सोडणार नाही असे सांगुन त्याचेकडील चाकुने उजव्या हाताच्या दंडावर मारुन फिर्यादीस जखमी केले. फिर्यादी यांना वाचवण्यासाठी त्यांचे मित्र तुषार जठार व गोपाल गुंडेकर हे मध्ये आले असता,त्यांनाही जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे हातातील चाकुने पोटात मारून,दोघांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच रस्त्याच्या बाजुला उभे असलेल्या ॲटो रिक्षाच्या काचा फोडुन,आरडा-ओरडा करुन दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. तसेच सदर इसमांनी जाताना फिर्यादी यांना शीवीगाळ करुन तीला पुन्हा मॅसेज केल्यास बघुन घेण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.जी.राठोड ९९२२७४४५९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**